# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५०

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल :affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/४५८ दिनांक : ०६ मे, २०१९

तातडीचे व महत्वाचे

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र,

विधी व शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षणशास्त्र

विषयः– सादर केलेल्या स्वमूल्यमापन अहवालाबाबत...

संदर्भः– या विभागाचे पत्र क्र. सीए/३६२, दि. २८ मार्च, २०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना 'स्वमूल्यमापन अहवाल' शैक्षणिक विभागात सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. त्यानुसार आपल्या महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांची माहिती शैक्षणिक विभागास प्राप्त झाली. तथापि सदर माहितीची शहानिशा केली असता त्यामध्ये प्रामुख्याने खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१. शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि इतर शिखर परिषदांनी दिलेल्या मान्यतेची (Extension of Approval) प्रत प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्क्यासह

२. जे मान्यताप्राप्त शिक्षण शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतून सेवा सोडून गेले आहेत अशा शिक्षकांची स्वतंत्र यादी

१. 'स्वमूल्यमापन अहवाल' (SAR) मधील माहिती अपूर्ण असून विशेषतः रकाना क्र. ११ मधील (Approved/Not Approved Teachers Details) माहिती अपूर्ण आहे.

२. काही महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी SAR सादर केले नाहीत. ज्या महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी SAR सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१९–२० करीता संलग्नीकरण देता येणार नाही. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९–२० साठी अशी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थां प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यास पात्र ठरणार नाही.

३. 'स्वमूल्यमापन अहवाला' मध्ये अभ्यासक्रमनिहाय, तुकडीनिहाय व अनुदानित/विनाअनुदानित शिक्षकांची माहिती दिलेली नाही.

४. प्राचार्य/संचालक/शिक्षकांच्या विद्यापीठ मान्यतेविषयी माहिती सदोष/अपूर्ण आढळून आली आहे.

५. एकाच अध्यापकाचे नाव एकाहून अधिक अभ्यासक्रमांसाठी दर्शविलेले आहे.

६. काही शिक्षकांची मान्यतापत्रे ते पूर्वी कार्यरत असलेल्या महाविद्यालयांची आहेत.

७. 'स्वमूल्यमापन अहवाला' मध्ये रकाना क्र. १३ मधील माहिती दिलेली नाही.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त दर्शवलेल्या त्रुटींची पूर्तता करून सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालय/ मान्यताप्राप्त परिसंस्थेचे प्राचार्य/संचालक अथवा कार्यालय अधीक्षक, ज्यांना स्वमूल्यमापन अहवालाबाबतची संपूर्ण माहिती अवगत आहे यांनी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. तसेच शैक्षणिक विभागाकडे स्वमूल्यमापन अहवालाची माहिती सादर केलेल्या संबंधित जबाबदार व्यक्तीने खालील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकास व वेळेनुसार **(संलग्नता कक्ष) शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७** येथे उपस्थित रहावे.

तसेच संबंधित अभ्यासक्रमास शासनाची व विद्यापीठाची मान्यतापत्रे, कार्यभाराची प्रत (Workload), शिक्षकांच्या विद्यापीठ मान्यतेची पत्रे व इतर आवश्यक ती सर्व कागदपत्रे सोबत आणावीत.

| अ.क्र. | तालुका | वार व दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर, नाशिक, दादरा व नगर हवेली | बुधवार, दि. ०८ मे, २०१९ | सकाळी ११.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.०० |
| २. | पुणे शहर | गुरूवार, दि. ०९ मे, २०१९ | सकाळी ११.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.०० |
| ३. | पुणे ग्रामीण | शुक्रवार, दि. १० मे, २०१९ | सकाळी ११.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.०० |

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)